BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारताच्या आयात निर्यात व्यापाराची दिशा, निवडक देशातील मौद्रिक धोरण आणि भारताच्या कृषी क्षेत्रातील व्यापार रचनेचा आढावा

डॉ. सुनिल अण्णा गोरडे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड,

ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर. 431103

ईमेल: sunilgorde1982@gmail.com

सारांश:

भू-राजकीय तणाव, आंतरराष्ट्रीय अस्थिरता, युद्ध, तीव्र होत जाणारे हवामानातील बदल या घटकांचा प्रामुख्याने आंतराष्ट्रीय व्यापारावरती प्रतिकूल परिणाम होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारावरती होणारे प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी प्रत्येक देश प्रयत्न करतो. प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या मौद्रिक धोरणाच्या माध्यमातून उपाय योजना राबविल्या जातात. सदरील संशोधन पेपर मध्ये भारताच्या आयात निर्यात व्यापाराची दिशा, भारत आयात निर्यात करत असलेल्या प्रमुख देशातील मौद्रिक धोरण आणि भारताच्या कृषी क्षेत्रातील आयात निर्यात रचनेचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

मुख्य शब्द: आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, मौद्रिक धोरण, कृषी क्षेत्रातील व्यापार

2024 या वर्षातील भारताच्या आयात निर्यातिची दिशा अभ्यासली असता असे दिसून येते की, भारताच्या एकूण आयतीमध्ये सर्वाधिक आयात चीन या देशातून 15.73 प्रतिशत, रशियामधून 8.85 प्रतिशत, युनायटेड अरब अमिरात या देशातून 8.19 प्रतिशत, युरोपीय संघातून 8.41 प्रतिशत तर अमेरिकेतून 6.33 प्रतिशत आहे. 2024 या वर्षांमध्ये भारताने सर्वाधिक निर्यात अमेरिका या देशांमध्ये केली. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये अमेरिकेतील निर्यातीचे प्रमाण 18.29 प्रतिशत, युरोपीय संघातील देशांमध्ये 17.83 प्रतिशत, युनायटेड अरब अमिराती या देशांमध्ये 8.54 प्रतिशत तर चीन या देशात 3.43 प्रतिशत निर्यात झाल्याचे दिसते. अमेरिका, युरोपीय संघ, युनायटेड अरब अमिराती, रशिया आणि चीन हे पाच देश / संघ भारताच्या आयतीमध्ये आणि निर्यातीमध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.[1] त्यामुळे सदरील संशोधनांमध्ये या पाच देशातील चालू वर्षातील मौद्रिक धोरणाचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

1) भारताच्या आयात निर्यात रचनेचा अभ्यास करणे.

2) भारतातून सर्वाधिक आयात आणि निर्यात करण्यात येणाऱ्या प्रमुख देशांच्या मौद्रिक धोरणाचा अभ्यास करणे.

3) भारताच्या कृषी क्षेत्रातील आयात आणि निर्यात घटकांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4) भारताच्या कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अधिक्याचा अभ्यास करणे.

तक्ता क्रमांक: 1 भारताच्या आयात निर्यातीची दिशा 2024

देश	एकूण आयातीशी प्रमाण %	देश	एकूण निर्यातीशी प्रमाण %
चीन	15.73	युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका	18.29
रशिया संघराज्य	8.85	युरोपियन संघ	17.83
युनायटेड अरब अमिराती	8.79	युनायटेड अरब अमिराती	8.59
युरोपियन संघ	8.41	सिंगापोर	3.59
युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका	6.33	चीन	3.43
सौदी अरेबिया	4.18	युनायटेड किंग्डम	3.21
इराक	4.01	सौदी अरेबिया	2.78
इंडोनेशिया	3.16	बांगलादेश	2.61
स्विझर्लंड	3.02	दक्षिण आफ्रिका	1.87
सिंगापोर	2.95	मलेशिया	1.85
एकूण आयातीचे मूल्य दशलक्ष USD	7,21,200.22	एकूण निर्यातीचे मूल्य दशलक्ष USD	4,34,435.48

संदर्भ: World Trade Organization Website

निवडक देशातील मौद्रिक धोरण:

फेडरल रिझर्व्ह सिस्टम ही अमेरिका या देशातील मध्यवर्ती बँक आहे. मे 2026 पासून केविन वॉर्श बँकेचे अध्यक्ष आहेत. सप्टेंबर 2026 मध्ये झालेल्या बैठकीमध्ये फेडचा प्रमुख व्याजदर (federal funds rate) हा 3.75 प्रतिशत वरून 4 प्रतिशत केला आहे. युद्ध आणि जागतिक अस्थिरतेमुळे वाढलेली महागाई नियंत्रित करण्यासाठी अमेरिकेतील मौद्रिक धोरण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

हे कडक नियंत्रण (Calibrated Tightening) असल्याचे आढळून येते. महागाईचे उद्दिष्ट 2 प्रतिशतच्या उद्दिष्टांपर्यंत खाली आणणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.[2] केविन वॉर्श यांच्या अगोदर अध्यक्ष असलेल्या जेरोम पॉवेल यांच्या काळात 2 प्रतिशत महागाई नियंत्रणात आणण्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. केविन वॉर्श यांनी अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेच्या धोरणाचे पुनरावलोकन करण्यासाठी 15 तज्ञ लोकांचा समावेश असलेल्या पाच विशेष अभ्यास गटाची स्थापना केली असून यामध्ये अनेक नामांकित अर्थतज्ञ, व्यावसायिक, उद्योजक व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची नियुक्ती केल्याचे दिसून येते. माहिती विश्लेषण, उत्पादकता आणि रोजगार, महागाई ,ताळेबंद व्यवस्थापन आणि संवाद धोरण यावरती हे पाच अभ्यास गट शिफारशी सुचवणार आहे. हावर्ड विद्यापीठातील भारतीय वंशाचे अर्थतज्ञ राज चेट्टी, रिझर्व बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर रघुराम राजन, एक्सबॉक्सच्या सीईओ आशा शर्मा यांची या अभ्यास गटात नियुक्ती असल्याचे दिसून येते.[3] सध्या वापरात असलेल्या आर्थिक डेटाच्या स्त्रोतांचे पुनरावलोकन करणे व रियल टाईम डेटा चा वापर करून त्वरित निर्णय घेणे यासाठी पहिला अभ्यास गट शिफारसी सुचवणार आहे. दुसरा अभ्यास गट अमेरिकेतील तंत्रज्ञान क्रांती व आर्टिफिशियल इंटेलिजन्स यामुळे नोकऱ्यांवर तसेच देशाच्या उत्पादकतेवर झालेला परिणाम अभ्यासणार आहे. तिसरा अभ्यास गट सध्याचे दोन प्रतिशत महागाईचे उद्दिष्ट योग्य आहे किंवा त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे काय या घटकावर अभ्यास करणार आहे. चौथ्या अभ्यास गटाकडे फेडरलच्या मालमत्तेचे व्यवस्थापन आणि पाचव्या अभ्यासगटाकडे फेडरलचे निर्णय सर्वसामान्य जनता व गुंतवणूकदारांना समजेल अशा भाषेत संवाद धोरणाचा आढावा घेण्यात येणार आहे.

युरोपियन सेंट्रल बँक ही युरोपियन युनियनची मध्यवर्ती बँक आहे. क्रिस्टीन लागार्ड या युरोपियन सेंट्रल बँकेच्या अध्यक्षा आहेत. सप्टेंबर 2026 च्या बैठकीमध्ये युरोपियन सेंट्रल बँकेने वाढत्या महागाईला नियंत्रित करण्यासाठी आपल्या प्रमुख तीन व्याजदरांमध्ये 0.25 प्रतिशत वाढ केली आहे.[4] युरोपियन युनियन मध्ये ज्या दराच्या आधारे युरो क्षेत्रातील व्यावसायिक बँका मध्यवर्ती बँकेकडे पैसे ठेवतात त्या दराला डिपॉझिट फॅसिलिटी रेट म्हणतात. तो दर सध्या 2.5 प्रतिशत आहे. मध्यवर्ती बँकेचा मुख्य बेंच कर्जदर मेन रिफायनान्सिंग ऑपरेशन रेट 2.65 प्रतिशत आहे. बँकांना तातडीच्या कर्जासाठी द्यावा लागणारा मार्जिनल लँडिंग फॅसिलिटी रेट हा 2.90 प्रतिशत आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे इंधनाच्या किमतीत वाढ होऊन महागाई वाढत आहे. महागाई नियंत्रणात आणून ती 2 प्रतिशत ठेवण्याचे युरोपियन सेंट्रल बँकेचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी युरोपियन युनियनचे मौद्रिक धोरण हे आकडेवारीवर आधारित आक्रमक भूमिका घेणारे कडक मौद्रिक धोरण (Measured Tightening / Data-Dependent Hawkish) असल्याचे दिसून येते.

सेंट्रल बँक ऑफ रशिया ही रशियाची मध्यवर्ती बँक असून जून 2013 पासून एल्व्हिरा नबीउलिना या पहिल्या महिला गव्हर्नर म्हणून या पदावर कार्यरत आहे. याअगोदर त्यांनी 2007 ते 2012 या काळात रशियाचे आर्थिक विकास आणि व्यापार मंत्री म्हणून काम केलेले आहे तसेच 2012 ते 2013 या काळात त्यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून काम पाहिलेले आहे. ऑक्टोंबर 2024 मध्ये सेंट्रल बँक ऑफ रशियाचा मुख्य व्याजदर 21 प्रतिशत इतक्या उच्चांकी पातळीवर गेल्याचे दिसून येते. ऑक्टोंबर 2026 मध्ये सेंट्रल बँक ऑफ रशियाचा मुख्य व्याजदर 14 प्रतिशत इतका आहे.[5] भूराजकीय तणावामुळे निर्माण होणाऱ्या महागाईच्या जोखमींना कमी करण्यासाठी रशियाने नियंत्रित आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्याचे दिसून येते. युक्रेन युद्धाच्या वाढत्या संरक्षण खर्चामुळे रशियातील महागाई मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. महागाई कमी करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ रशियाला व्याजदरामध्ये ऐतिहासिक वाढ करावी लागल्याचे आढळून येते. सेंट्रल बँक ऑफ रशियाने वार्षिक महागाईचा दर 4 प्रतिशत राहील यासाठी तसेच देशातील लोकांची गुंतवणूक आणि भांडवल बाहेरच्या देशात जाऊ नये यासाठी एल्व्हिरा नबीउलिना यांनी नियंत्रित मौद्रिक धोरणाची (Restrictive Monetary Policy) आखणी केल्याचे आढळून येते. दीर्घकाळ मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नर पदावर असणाऱ्या अनुभवाचा निश्चितच रशियाला लाभ झाल्याचे दिसून येते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सेंट्रल बँक ऑफ द युनायटेड अरब अमिराती ही युनायटेड अरब अमिराती या देशाची मध्यवर्ती बँक आहे. खालिद मोहम्मद बलामा हे या बँकेचे गव्हर्नर आहे. सप्टेंबर 2026 मध्ये ओव्हर नाईट डिपॉझिट फॅसिलिटी बेस रेट मध्ये 0.25 प्रतिशत वाढ करून 3.90 प्रतिशत करण्यात आला. शॉर्ट टर्म लिक्विडिटी बोरोइंग रेट 4.40 प्रतिशत आहे. युएईचे चलन दिरहाम हे अमेरिकन डॉलर सोबत निश्चित दराने जोडलेले असल्यामुळे अमेरिकेने व्याजदर वाढविल्यामुळे युएईने व्याजदरात वाढ केली. युएईने मौद्रिक धोरणाबाबतीत अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणाशी सुसंगत कडक नियंत्रण धोरण स्वीकारले आहे.[6]

पीपल्स बँक ऑफ चायना ही चीन या देशातील मध्यवर्ती बँक असून पॅन गॉन्गशेंग हे सध्याचे गव्हर्नर आहे. चीनमध्ये मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून वेगवेगळ्या उद्देशासाठी वेगवेगळे व्याजदर असल्याचे दिसून येतात. एक वर्षासाठी लोन प्राईम रेट तीन प्रतिशत असून हा व्यावसायिकांसाठी महत्त्वपूर्ण बेंचमार्क कर्जदर आहे. पाच वर्ष गृह कर्जासाठी महत्त्वाचा असणारा लोन प्राईम रेट 3.5 प्रतिशत आहे.[7] अल्पकालीन धोरणात्मक दर (सेवन डे रीवर्स रेपो रेट)हा 1.40 प्रतिशत आहे. व्यापारी बँकांना या दराने तात्पुरत्या कालावधीसाठी कर्ज मिळते. गुंतवणूकदारांसाठी बँकेत ठेवलेल्या ठेवीवरील व्याजाचा दर 0.35 प्रतिशत आहे. पायाभूत सुविधा व तंत्रज्ञान क्षेत्रातील विकासासाठी सरकारी प्रकल्पांना स्वस्त कर्ज देण्याच्या उद्देशाने चीन या देशांमध्ये पीएसएल हा व्याजदर महत्त्वाचा आहे. सप्टेंबर 2026 मध्ये 0.25 प्रतिशत घट करून पीएसएल व्याजदर सध्या 1.50 प्रतिशत आहे.[6] चीनमध्ये गृहनिर्माण क्षेत्रातील मंदी आणि देशांतर्गत मागणी वाढवण्यासाठी पीपल्स बँक ऑफ चायना मौद्रिक धोरणाच्या माध्यमातून तरलता वाढवत असल्याचे दिसून येते.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ऑक्टोंबर 2026 मध्ये पतधोरण समितीच्या बैठकीनंतर अडीच वर्षानंतर रेपो दरात पाव टक्का वाढ केली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तणाव आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील होणाऱ्या परिणामाचा विचार करून भारतीय रिझर्व बँकेने एकमताने रेपो दर 5.5 प्रतिशत वरती नेला. सध्या महागाईचा दर 5.2 प्रतिशत वर जाण्याचा अंदाज रिझर्व बँकेला असल्यामुळे भारतीय रिझर्व बँकेने मागील दोन वर्ष स्वीकारलेले तटस्थ धोरण बदलून आता सुनियोजित कठोरपणा असलेले मौद्रिक धोरण स्वीकारले आहे. भारतीय रिझर्व बँकेचे स्टँडिंग डिपॉझिट फॅसिलिटी रेट 5.25 प्रतिशत, तर मार्जिनल स्टॅडिंग फॅसिलिटी रेट आणि बँक रेट 5.75 प्रतिशत वर नेण्यात आले आहे.[8]

तक्ता क्रमांक: 2 भारताच्या निर्यातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटक (रक्कम कोटी रुपये)

घटक	**एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीशी प्रमाण %**	**एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीशी प्रमाण %**	**एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीशी प्रमाण %**
वर्ष	2015-16	2022-23	2023-24
कॉफी	2.37	2.37	2.62
बासमती तांदूळ	10.54	9	11.95
इतर तांदूळ	7.18	11.94	9.33
मसाले	7.72	7.11	8.68

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

काजू	2.33	0.67	0.69
साखर	4.56	10.82	5.77
दूध उत्पादने	2.43	1.10	0.95
म्हशीचे मास	12.38	5.99	7.65
सागरी उत्पादने	14.50	15.17	15.07
कापूस	5.96	1.45	2.28
गहू	0.49	2.76	0.11
तेल पशुखाद्य	1.67	3.02	3.50
एरंडी तेल	2.14	2.36	2.19
भारतातील एकूण कृषी निर्यात	2,15,396.32	4,37,767.46	4,04,900.42
एकूण राष्ट्रीय निर्यात	17,16,384.40	3621549.88	36,18,952.27
कृषी निर्यातीचे एकूण राष्ट्रीय निर्यातीशी प्रमाण	12.55 %	11.81 %	11.19%

संदर्भ: Agricultural statistics at a glance 2024-25

भारताच्या निर्यातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटकांचा तुलनात्मक अभ्यास:

2015-16 या वर्षांमध्ये भारतातील एकूण निर्यातीमध्ये कृषी क्षेत्रातील निर्यातीचे प्रमाण 12.55 प्रतिशत असल्याचे दिसते. 2022-23 मध्ये हे प्रमाण अल्प प्रमाणात कमी होऊन 11.81 प्रतिशत तर 2023-24 मध्ये 11.19 प्रतिशत झाले. 2015-16 मध्ये भारतातील कृषी क्षेत्रामधून सर्वात सर्वाधिक निर्यात सागरी उत्पादनाची झाल्याचे दिसून येते. सागरी उत्पादनाचे एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीशी असलेले प्रमाण 14.50 प्रतिशत, म्हशीचे मांस 12.38 प्रतिशत, बासमती तांदूळ 10.54 प्रतिशत, इतर तांदूळ 7.18 प्रतिशत, मसाले 7.72 प्रतिशत, कापूस 5.96 प्रतिशत तर साखरेच्या निर्यातीचे एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीशी असलेले प्रमाण 4.56 प्रतिशत होते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2022-23 मध्ये एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीमध्ये सर्वाधिक निर्यात सागरी उत्पादने, इतर प्रकारचा तांदूळ, साखर, बासमती तांदूळ, मसाले आणि म्हशीचे मास यांचा समावेश असल्याचे दिसते.

2023-24 मध्ये कृषी क्षेत्रातील एकूण निर्यातीमध्ये सर्वाधिक निर्यात सागरी उत्पादनाचीच झाल्याचे दिसते. एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीमध्ये सागरी उत्पादनाच्या निर्यातीचे प्रमाण 15.07 प्रतिशत, बासमती तांदुळाच्या निर्यातीचे प्रमाण 11.95 प्रतिशत, इतर प्रकारच्या तांदुळाच्या निर्यातीचे प्रमाण 9.33 प्रतिशत, मसाल्याच्या निर्यातीचे प्रमाण 8.68 प्रतिशत, म्हशीच्या मासाच्या निर्यातीचे प्रमाण 7.65 प्रतिशत, साखरेच्या निर्यातीचे प्रमाण 5.77 प्रतिशत आहे.

तक्ता क्रमांक: 3 भारताच्या आयातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटक (रक्कम कोटी रुपये)

घटक	**एकूण कृषी क्षेत्रातील आयातीशी प्रमाण%**	**एकूण कृषी क्षेत्रातील आयातीशी प्रमाण %**	**एकूण कृषी क्षेत्रातील आयातीशी प्रमाण %**
वर्ष	2015-16	2022-23	2024-25
डाळी	18.27 %	5.72 %	11.80 %
मसाले	3.85 %	3.87 %	8.53 %
काजू	6.20 %	5.21 %	4.49 %
खाद्यतेल	48.98 %	60.67 %	46.74 %
साखर	2.88 %	0.86 %	6.25 %
ताजी फळे	7.90 %	7.23 %	8.60 %
मादक पेय	2.09 %	2.31 %	4.18 %
कापूस	1.84 %	4.17 %	1.87 %
इतर तेलबिया	0.05 %	1.28 %	2.00 %
भारतातील एकूण कृषी आयात	1,40,289.22	2,75,704.09	2,63,314.12
एकूण राष्ट्रीय आयात	24,90,303.76	57,49,801.3	56,16,042.37

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

कृषी आयातीचे एकूण राष्ट्रीय आयातीशी प्रमाण	5.63 %	4.80 %	4.69 %

संदर्भ: Agricultural statistics at a glance 2024-25

भारताच्या आयातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटकांचा तुलनात्मक अभ्यास:

2015-16 मध्ये भारताच्या एकूण आयातीमध्ये कृषी क्षेत्रातील आयातीचे प्रमाण 5.63 प्रतिशत होते, 2022-23 मध्ये ते 4.80 प्रतिशत तर 2024-25 मध्ये 4.69 प्रतिशत झाले. 2015-16 मध्ये कृषी क्षेत्रातील एकूण आयातीमध्ये खाद्यतेल आयातीचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते. 2015-16 मध्ये खाद्यतेल आयातीचे कृषी क्षेत्रातील आयातीशी असलेले प्रमाण 48.98 प्रतिशत, डाळींच्या आयातीचे प्रमाण 18.27 प्रतिशत, ताज्या फळांच्या आयातीचे प्रमाण 7.90 प्रतिशत, काजूच्या आयातीचे प्रमाण 6.20 प्रतिशत, मसाल्यांच्या आयातीचे प्रमाण 3.85 प्रतिशत आणि साखरेच्या आयातीचे एकूण कृषी क्षेत्रातील आयातीशी असलेले प्रमाण 2.88 प्रतिशत होते.

2022-23 मध्ये कृषी क्षेत्रातील एकूण आयतीमध्ये खाद्यतेल आयातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. त्यानंतर ताजी फळे, डाळी, काजू, कापूस, मसाले आणि मादक पेय यांची आयात प्रामुख्याने कृषी क्षेत्रातील आयातीमध्ये सर्वाधिक असल्याची दिसते.

2024-25 मध्ये कृषी क्षेत्राच्या एकूण आयातीमध्ये खाद्यतेल आयातीचे सर्वाधिक प्रमाण 46.74 प्रतिशत असल्याचे दिसते. त्यानंतर डाळींच्या आयातीचे प्रमाण 11.80 प्रतिशत, ताज्या फळांच्या आयातीचे प्रमाण 8.60 प्रतिशत, मसाल्यांच्या आयातीचे प्रमाण 8.53 प्रतिशत, साखरेच्या आयातीचे प्रमाण 6.25 प्रतिशत, काजूच्या आयातीचे प्रमाण 4.49 प्रतिशत, मादक पेयांच्या आयातीचे प्रमाण 4.18 प्रतिशत आणि इतर तेलबियांच्या आयातीचे प्रमाण दोन प्रतिशत दिसून आले.[9]

निष्कर्ष:

1) भारताची सर्वाधिक निर्यात आणि आयात अमेरिका, युरोपीय संघ, युनायटेड अरब अमिराती, रशिया, सिंगापोर आणि चीन या देशांसोबत होते. या देशातील मध्यवर्ती बँकेच्या मौद्रिक धोरणाचा भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरती परिणाम होतो. अमेरिका, युरोपीय संघ, युनायटेड अरब अमिराती आणि रशिया या देशातील मौद्रिक धोरणाच्या अभ्यासातून असे दिसून येते की त्या देशांमध्ये महाग चलन धोरण आहे. तर चीन या देशांमध्ये सुलभ मौद्रिक धोरण आहे.

2) भारताच्या निर्यातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटकांच्या तुलनात्मक अभ्यासावरून असे दिसून येते की, आर्थिक वर्ष 2015-16, 2022-23 आणि 2023-24 मध्ये भारताच्या कृषी क्षेत्रातील एकूण निर्यातीमध्ये सागरी उत्पादनाचे प्रमाण सर्वाधिक राहिलेले आहे. त्यानंतर बासमती तांदूळ, इतर प्रकारचा तांदूळ, मसाले, साखर, म्हशीचे मास, तेल पशुखाद्य, एरंडी तेल,कॉफी, या घटकांची निर्यात प्रामुख्याने झाली आहे. कृषी क्षेत्रातून सर्वाधिक निर्यात होणाऱ्या घटकांकडे प्रामुख्याने निर्यात वाढवण्याच्या दृष्टिकोनातून धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहे.

3) कृषी आधारित दुग्ध व्यवसायातील निर्यातीचे प्रमाण सदरील काळात मोठ्या प्रमाण 2.43 प्रतिशत वरून 0.95 प्रतिशत इतके कमी झाले. याच कालावधी कापसाची निर्यात मोठ्या प्रमाणात कमी झाली.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4) एरंडी तेलाच्या निर्यातीचे प्रमाण तिन्ही वर्षांमध्ये लक्षणीय असल्यामुळे प्रामुख्याने या घटकाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

5) भारताच्या आयातीमध्ये कृषी क्षेत्रातील प्रमुख घटकांच्या तुलनात्मक अभ्यासावरून असे दिसून येते की, 2015-16, 2022-23 आणि 2024-25 या तीनही वर्षांमध्ये खाद्यतेलाच्या आयातीचे प्रमाण हे लक्षणीय आहे. सदरील काळामध्ये डाळींच्या आयातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटल्याचं दिसून येतं परंतु आजही कृषी क्षेत्रातील आयातीमध्ये डाळींच्या आयातीचे प्रमाण लक्षणीय आहे.

6) 2024 मध्ये एकूण कृषी क्षेत्रातील निर्यातीमध्ये साखरेच्या निर्यातीचे प्रमाण 5.77 प्रतिशत होते. याच वर्षी साखरेच्या आयातीचे एकूण कृषी क्षेत्रातील आयतिशी असलेले प्रमाण 6.25 प्रतिशत आहे. म्हणजेच भारताच्या आयात आणि निर्यातीमध्ये साखर हा महत्त्वपूर्ण घटक आहे.

7) भारतामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस या पिकाखालील लागवडीचे क्षेत्र आहे. कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते तरीही कापसाच्या आयातीचे प्रमाण तिन्ही वर्षांमध्ये लक्षणीय आहे. अभ्यास करण्यात आलेल्या आकडेवारीवरून काजूंच्या आयतीसाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होत असल्याचे दिसते.

8) भारताचा कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापार हा मोठ्या प्रमाणावर आधिक्यात (Trade Surplus) असून, भारतासाठी कृषी क्षेत्र हे परकीय चलन मिळवून देणारे एक प्रमुख व लाभदायक क्षेत्र ठरले आहे. 2024-25 मध्ये भारताने 2,63,314.12 कोटी रुपयाची कृषी क्षेत्रातील मालाची आयात केली तर याच वर्षी 4,04,900.42 कोटी रुपयाची कृषी क्षेत्रातील मालाची निर्यात केली. भारताला कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापारातून मोठ्या प्रमाणात अधिक्य असल्याचे दिसते.

संदर्भ:

1) World Trade Organization, Trade data, 2014,2024.

WTO Tariff & Trade Data | Reports / Imports & exports pattern - Top partners, WTO Tariff & Trade Data | Reports / Imports & exports pattern - Top partners

2) Federal Open Market Committee statement, September 16, 2026.

Federal Reserve issues FOMC statement

3) Board of governors of the of the federal Reserve System, Task Forces for Advancing Monetary Policy, FOMC press Conference June 17, 2026,Federal Reserve Board - Monetary Policy

4) European Central Bank Monetary policy decisions, 10 September 2026, Monetary policy decisions

5) The Bank of Russia Monetary policy, 27 July 2026. Monetary Policy | Bank of Russia

6) Central Bank of the U.A.E., Quarterly Economic Review, September 2026.

7) The People's Bank of China Highlights of Monetary Policies,11 may 2026, in Q1 2026

Highlights of Monetary Policies in Q1 2026

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

8) RBI, Monetary Policy Statement, 2026-27 Resolution of the Monetary Policy Committee October 5 to 7, 2026, Press Releases | Official Website of Reserve Bank of India

9) Agricultural statistics at a glance 2024-25, Government of India, Ministry of agriculture and farmers welfare, Department of agriculture and farmers welfare, Economics, Statistics and Evaluation Division.

Agricultural Statisitcs at a Glance 2024 25 11da3cd37d.pdf

10) Economic Survey, 2024-25, Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division, North Block, New Delhi-110001 January, 2025.